**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक


# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ९३ वा ● रविवार २० ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 93 | Date : 20/08/2023 | blow : Sunday | Page 4 | Price 4


## चांद्रयान-३ चंद्रापासून अवघ्या २५ किमी अंतरावर

### लँडिंगचा शेवटचा टप्पा पार केला

नवी दिल्ली : भारताची महत्त्वाकांक्षी मोहिम चांद्रयान-३ ही अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात आहे. चंद्राच्या पृष्ठभागावर चांद्रयान-३ उतरण्यासाठी फक्त ३ दिवस उरले आहेत. अशा परिस्थितीत, विक्रम लँडर आता त्याची उंची आणि वेग कमी करत आहे. चांद्रयान-३ ने रात्री उशिरा म्हणजेच रविवारी (२० ऑगस्ट) पहाटे २ ते ३ च्या दरम्यान आणखी एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. विक्रम लँडर चंद्राच्या जवळ पोहोचले आहे. आता विक्रम लँडर चंद्रापासून फक्त २५ किलोमीटर अंतरावर आहे.

मिशन मूनचा आणखी एक टप्पा पार करताना आज पहाटे १.५० वाजता विक्रम लँडरचे यशस्वीरित्या डी-बूस्टिंग करण्यात आले. म्हणजेच चांद्रयान-३ चा वेग कमी करण्यात यश आले आहे. इस्रोने या संदर्भात माहिती दिली आहे. तर, अंतिम डीबूस्टिंग ऑपरेशनने यशस्वीरित्या एलएम कक्षा २५ किमी ु १३४ किमी पर्यंत कमी केली आहे. मॉड्यूलला अंतर्गत तपासणी करावी । पान २ वर

## ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांना पहिला उद्योगरत्न पुरस्कार प्रदान

मुंबई : उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा पहिला 'उद्योगरत्न' पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक, पद्मविभूषण रतन टाटा यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आला. 'टाटा म्हणजे ट्रस्ट. टाटा म्हणजे विश्वास अशी जगभर ख्याती असलेल्या उद्योग समूहाचे रतन टाटा यांना हा पुरस्कार देण्याने पुरस्काराचा सन्मान वाढला आहे,'असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पुरस्कार प्रदान केल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.



टाटा यांना त्यांच्या कुलाबा येथील निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह मान्यवरांनी २५ लाख रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व मानपत्र या स्वरुपात पुरस्कार प्रदान केला.याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, टाटा सन्सचे चेअरमन तथा महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी उपस्थित होते.

पुरस्कार प्रदान केल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मीठापासून ते वाहने, विमानांपर्यंत टाटा समूहाच्या उद्योगातून निर्मिती होते. टाटा समुहाने देशासह, जगभरात उद्योग क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. टाटा म्हणजेच विश्वास हे नाते आहे. राज्य शासनातर्फे उद्योग क्षेत्रातील योग्य व्यक्तीला पहिला पुरस्कार देण्यात येत असल्याचा आनंद आहे. या पुरस्काराने पुरस्काराचा मानसन्मान वाढला, उंची वाढल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

तत्पूर्वी श्री. टाटा यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी श्री. टाटा यांच्यासमवेत श्री. चंद्रशेखरन आदींशी उद्योग आणि राज्यातील विकास प्रकल्पांविषयी चर्चा केली.महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या नामवंत उद्योजकांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराच्या धर्तीवर या वर्षीपासून राज्य शासनाने 'महाराष्ट्र उद्योग पुरस्कार' देऊन त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. यात उद्योगरत्न पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक पद्मविभूषण । पान २ वर

### लडाखमध्ये मोठी दुर्घटना

## भारतीय लष्कराचं वाहन दरीत कोसळून ९ जवान शहीद

लडाख :केंद्रशासित प्रदेश लडाखमध्ये शनिवारी संध्याकाळी मोठी दुर्घटना घडली आहे. लडाखमध्ये भारतीय लष्कराच्या वाहनाचा मोठा अपघात झाला आहे. राजधानी लेहजवळील क्यारी गावातून जाणारं लष्कराचं एक वाहन दरीत कोसळलं आहे. या भीषण अपघातात भारतीय लष्कराच्या नऊ जवानांचा मृत्यू झाल्याचं लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. नऊ जवान शहीद झाल्याची लष्कराने पुष्टी केली आहे, तर या अपघातात एक जवान जखमी झाला आहे. मृतांमध्ये आठ सैनिक आणि एक जेसीओ (ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर) यांचा समावेश आहे.

भारतीय लष्कराशी संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लष्कराच्या या वाहनाबरोबर एक रुग्णवाहिका आणि एक यूएसव्ही गाडीदेखील जात होती. या सर्व वाहनांमध्ये लष्कराचे एकूण ३४ जवान प्रवास करत होते. शनिवारी संध्याकाळी ६.३० वाजता लष्कराच्या ट्रकचा अपघात झाला. लष्करी वाहनं क्यारी शहरापासून ७ किलोमीटर अंतरावर असताना हा अपघात झाला. लष्कराचं वाहन खोल दरीत कोसळलं. हे जवान कारू गॅरीसनहून लेहजवळच्या क्यारी शहराच्या दिशेने जात होते.



हे गाव भारत आणि चीनच्या सीमेवरील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेला (एलएसी) लागून आहे.। पान २ वर

## गोविंदांना मिळणार विमा कवच; प्रो-गोविंदा स्पर्धेवरही शिक्कामोर्तब




मुंबई : दहिहंडी उत्सवादरम्यान मानवी मनोरे रचताना अपघात किंवा दुर्घटना होण्याची शक्यता असते, त्यामुळेच गोकुळ अष्टमीला दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या राज्यातील गोविंदांना विमा कवच मिळणार आहे. राज्य सरकारच्या क्रीडा खात्यातर्फे नुकतंच एक परिपत्रक जारी करुन राज्यातील ५० हजार गोविंदांना विम्याचं कवच देण्यात आलं आहे. ५० हजार गोविंदांचा विमा उतरवण्यासाठी ३७ लाख ५० हजार देण्यात आले आहेत. तर राज्य सरकारने ठरवल्याप्रमाणे यंदापासून प्रो-लीग गोविंदा स्पर्धाही होणार आहे.२०१४ पासून प्रो-लीग गोविंदा स्पर्धेचं आयोजन करण्यात येणार अशी मागणी होती, ती यंदा पूर्ण होत आहे. वरळी येथे डोम थिएटरमध्ये या स्पर्धेचं आयोजन करण्यात येणार आहे. ३१ ऑगस्ट रोजी मुंबई येथील । पान २ वर

## 'ज्यांचे फोटो लावतो, त्यांनी किती शाळा केल्या, आपले देव ओळखायला शिका, छगन भुजबळांचे वक्तव्य

नाशिक :'आम्ही कुठेही गेलो तरी शाहू फुले आंबेडकरांचा वारसा सोडणार नाही. संभाजी भिडेंचे खरे नाव मनोहर कुलकर्णी असून ब्राह्मण समाजात कोणीही शिवाजी, संभाजी नाव ठेवत नाही असं भुजबळांनी म्हंटल. यासोबतच ज्यांचे आपण फोटो लावतो, त्यांनी किती शाळा केल्या, त्यांनी सर्वांना का नाही शिकवलं? आपण आपले देव ओळखायला शिका, अस म्हणत पुन्हा सरस्वती देवीवरून छगन भुजबळांनी अप्रत्यक्षपणे टिका केली आहे.

नाशिक शहरातील मखमलाबाद परिसरातील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या शैक्षणिक संकुलात आयोजित समाजदिन सोहळ्याला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी ते बोलत होते. छगन भुजबळ यावेळी म्हणाले की, ज्यांचे आपण फोटो लावतो, त्यांनी किती शाळा केल्या. त्यांनी सर्वांना का नाही शिकवलं असा प्रश्न उपस्थित करत आपण आपले देव ओळखायला शिका, असा सल्ला भुजबळांनी दिला. तसेच शाळा, महाविद्यालयांत मेरिटमध्ये अनेक मुली असतात, त्यात मुस्लिम मुली देखील असतात, ते पाहिल्यावर समाधान वाटतं, असेही भुजबळ म्हणाले.



छगन भुजबळ पुढे म्हणाले की, अजित दादांनी कबूल केलेले पैसे मिळणार असून वेगवगेळे अभ्यासक्रम महाविद्यालयांत शिकवले गेले पाहिजते. त्यासाठी मुलांना वेगवेगळ्या फॅकल्टीमधून शिकू दिले पाहिजे. जे शिक्षण घेता येईल ते घेऊ दिले पाहिजे. अलीकडे सोशल मीडियाचा वापर वाढत चालला असून सोशल मीडियाचा अतिरेक बरा नाही. । पान २ वर

## अजित पवारांची बीडमधील उत्तर सभा होणारच, धनंजय मुंडेंची माहिती

मुंबई : शरद पवारांच्या बीड जिल्ह्यातील सभेला प्रत्युत्तर देण्यासाठी अजित पवार यांची होणारी सभा रद्द होणार, अशा चर्चा होत्या. पण मंत्री धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांची सभा होणार असल्याची माहिती दिली आहे. धनंजय मुंडे यांनी ट्वीट करत अजित पवार यांची बीडमध्ये २७ ऑगस्ट रोजी उत्तर सभा होणार असल्याची माहिती दिली आहे. बीडमधील सभेमध्ये शरद पवारांनी धनंजय मुंडे आणि अमरसिंह मुंडे या अजित पवारांच्या गटातील नेत्यांवर जोरदार टीका केली होती. २७ तारखेला होणाऱ्या उत्तर सभेतून धनजंय मुंडे अथवा अजित पवार काय उत्तर देणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड येथे दिनांक २७ ऑगस्ट रोजी जाहीर सभा होणार असून । पान २ वर

## अजित पवार सत्तेत गेले याची चीड यायला हवी; राज ठाकरेंचा सध्याच्या राजकारणावर संताप

पुणे : महाराष्ट्रातील अस्थिर राजकारणावरुन राज ठाकरेंनी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. पंतप्रधान मोदींनी अजित पवारांसह राष्ट्रवादीवर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले होते आणि आठवड्याभरातच अजित पवार भाजपशी हात मिळवणी करुन उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतात, या सर्व स्थितीवरुन राज ठाकरेंनी पत्रकारांना देखील खडसावलं आहे. राज ठाकरे आज (१९ ऑगस्ट) पुण्यात पत्रकारांच्या गौरव समारंभात उपस्थित होते, त्यावेळी त्यांनी अनेक मुद्द्यावर भाष्य केलं आहे.

पंतप्रधान आठवडाभरपूर्वी काहीतरी बोलतात, त्याचे पडसाद उमटतात आणि काही दिवसांत अजित पवार थेट शपथविधी घेतात, त्यानंतर पत्रकार परिषदेत ते वाट्टेल ते बोलतात अन् पत्रकार तिथं हसतात, ही काय पत्रकारिता आहे का? असं म्हणत राज ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधत पत्रकारांनाही चांगलंच खडसावलं आहे. मुळात अजित पवार सत्तेत गेले याची चीड यायला हवी, असं म्हणत राज ठाकरेंनी पत्रकारांवरही रोष व्यक्त केला. पूर्वी असं काही घडलं की पत्रकार फटकारुन काढायचे, सळो की पळो । पान २ वर



## गौडगांव जागृत मारुती अन्नछत्र मंडळात भाविकांची अलोट गर्दी



मागील वर्षापासून जागृत मारुतीच्या दर्शनासाठी नियमितपणे येतो.दर्शन व महाप्रसादाने मनाला समाधान लाभत आहे.अन्नछत्र मंडळाचे कार्य सूक्ष् सेमपणे चालू आहे.दर्जेदार महाप्रसाद मिळत असुन या दर्जेदार महाप्रसादाने भाविक भक्त तृप्त होत आहेत.

**बसवराज पाटील**
**मंदरवाड (पोलिस पाटील),जिल्हा कलबुर्गी**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्रावणमास व सलग सुट्ट्यामुळे अक्कलकोट तालुक्यातील गौडगांव बु।।येथील भक्तांचे श्रद्धास्थान,'संकट मोचन',श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिसुन आली.महाप्रसादाची सेवा पाहून,येणाऱ्या मारुती भक्तांकडून अन्नदान सेवा करण्याचा कल वाढलेला दिसून आला.यावेळी 'रामभक्त हनुमान की,जय,'पवनसुत' हनुमान की,जय,जय बजरंग अशा घोषणा देत मारूती चरणी भाविक भक्त लिन झाले.

गौडगांव येथील हेमांडपंथी दक्षिणमुखी जागृत मारुतीच्या अभिषेकासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.शनिवारी पहाटे ५वाजेच्या सुमारास होमहवनला सुरुवात करण्यात आली.यावेळी शेकडो भाविकांनी या यज्ञाचा लाभ घेतले. सोलापूर येथील पुराणिक बुवा भजनी मंडळ यांनी विविध वाद्यासह दिवसभर मोफत भजन सेवा केली.भाविकांनी रात्री पासुनच हजेरी लावली होती.

दुपारच्या महाआरतीचा मान सोलापूर येथील अमोल सुरवसे यांना मिळाला तर अक्कलकोट येथील लक्ष्मी स्टीलचे मालक चौधरी शेठ व बार्शी 'चे रमेश खांडेकर यांच्याकडून श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे आयोजन केले होते.

श्रावण मास व सलग सुट्ट्यामुळे जागृत मारुतीच्या दर्शनासाठी कर्नाटक व महाराष्ट्र राज्यातील अनेक भागातून आलेल्या भाविक गौडगांव येथे दाखल झाले होते.

मंडळाच्या विश्वस्तांच्या नियोजनाखाली दर्शन व्यवस्था पारदर्शक ठेवण्यात आली होती.यावेळी मंदिराचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे,प्रकाश मेंथे,सिद्राम वाघमोडे,भारत ननवरे,चौडप्पा सोलापूरे,बिरप्पा पुजारी,परमेश्वर सुतार,ज्ञानेश्वर फुलारी,श्रीमंत म्हेत्रे, श्रीमंत सावळतोट,प्रकाश सनकळ,अमसिद्ध कोरे यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अधिकमासात भाविकांकडून मंदिर समितीस रू.७.१९ कोटीचे दान

पंढरपूर/प्रतिनिधीः अधिकमास दि.१८/०७/२०२३ ते दि.१६/०८/२०२३ या कालावधीत संपन्न झाला. या कालावधीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. त्यांना मंदिर समितीकडून पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या अधिकमासात मंदिर समितीस विविध माध्यमांतून रक्कम रू.७,१९,४३,०३७/- इतके उत्पन्न मिळालेले आहे. सन २०१८ मध्ये रू.२,३२,५१,९२४/- इतके उत्पन्न मिळाले होते. सन २०१८ च्या तुलनेने यावर्षीच्या अधिकमासाच्या उत्पन्नात रू.४,८६,९१,११३/- इतकी वाढ झाली असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी श्री.राजेंद्र शेळके यांनी दिली. तसेच या कालावधीत ६,३९,९१७ भाविकांनी पदस्पर्शदर्शन व सुमारे ५,००,००० भाविकांनी मुखदर्शनाचा लाभ घेतला आहे. श्रींच्या चरणाजवळ, नित्यपुजा, लाडूप्रसाद, अन्नछत्र, देणगी, महानैवेद्य, भक्तनिवास, तुळशीपूजा, मोबाईल लॉकर इत्यादी माध्यमांतून सदरचे उत्पनन मिळालेले आहे.



अधिकमासात सोने-चांदीच्या वस्तू दान करण्याची प्रथा असून, रक्कम रू.२,४९,८,८९०/- किंमतीचे सोने व रू.८,१८,८५९/- किंमतीचे चांदीच्या वस्तू भाविकांकडून प्राप्त झालेल्या आहेत. या सर्व प्राप्त देणगीतून भाविकांना अत्याधुनिक व पुरेसा प्रमाणात सोई सुविधा देण्याचा प्रयत्न मंदिर समितीचा राहणार असल्याचे सह अध्यक्ष श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगीतले.

## ✻ सुविचार ✻

छटाकभर प्रेम शेरभर ज्ञानापेक्षा वरचढ असते.– जॉन वेरली

## संपादकीय

### दृढ करण्याची संधी...

भारताचा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, संरक्षण ही राष्ट्रीय विकासाची प्रमुख क्षेत्रे मानली जातात. या क्षेत्रामंध्ये भारताची दमदार वाटचाल सुरु आहे, असे जगभरातील तज्ज्ञांचे मत आहे. देशासह जगाचे लक्ष चांद्रयान–३ कडे लागले आहे. ही मोहीम अंतराळ क्षेत्रात नवा इतिहास घडवण्याच्या उंबरठ्यावर उभी आहे. यंदाचा स्वातंत्र्यदिन मुलखाच्या गावखेड्यातील शेकडो मातांच्या आयुष्यात एक नवे वळण आणणारा ठरला. या दिवशी महिलांनी त्यांच्या गावात साजऱ्या होणाऱ्या स्वातंत्र्य दिवसाच्या कार्यक्रमात भाषण केले. अशा प्रकारे भाषण करण्याची कदाचित अनेकांची ती पहिलीच वेळ होती. ही संधी मातांना केंद्र सरकारच्या निपुण भारत योजनेने मिळवून दिली आहे. या योजनेंतर्गत गटातील महिलांच्या मोबाइलवर शिक्षणाशी संबंधित रोज एक व्हिडिओ पाठवला जातो. तो बघून त्या महिलांनी त्यांच्या मुलांना घरी शिकवणे अपेक्षित आहे. मुलांचे शिक्षण शाळेच्या चार भिंतीपुरते मर्यादित नाही. त्यापलीकडेही मुले अनेक प्रकारे शिकतात. त्यासाठीचे वातावरण मुलांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, याची जाणीव समाजाला काही प्रमाणात तरी झाली असावी. प्रयोगशील शिक्षक आणि सुजाण पालक मूल्यशिक्षणाचे अनेक प्रयोग राबवताना आढळतात. ते प्रयोग मुलांनी प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी घरातील वातावरण पूरक असायला हवे. मुलांवर संस्कार करण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची, त्यांचा अभ्यास करून घेण्याची जबाबदारी विशेष करून महिलांची आहे, अशी समाजमान्यता आढळते. जाणत्यांना समाजात मूल्यांचा अभाव जाणवतो. मुलांमध्ये मूल्यांची रुजवण कमी होत आहे, हा सामाजिक चिंतेचा विषय आहे. त्याचे अनेक प्रकारचे दुष्परिणाम समाज अनुभवत आहे. अल्पवयीन मुलांचा गुन्ह्यांमध्ये सहभाग वाढत आहे, क्रोध अनावर होत आहे, किरकोळ कारणांवरून मुले त्यांच्याच मित्रांचा जीव घ्यायलाही कचरत नाहीत. आदर, आपुलकी, सहचर्य, सहकार्य, जिव्हाळा, संवेदनशीलता आढळत नाही. पालक आणि मुलांमध्ये संवादाचा अभाव हे याचे एक प्रमुख कारण मानले जाते. तो संवाद पुन्हा एकदा दृढ करण्याची संधी उपरोक्त प्रयोग उपलब्ध करून देऊ शकेल.

## अँट्रोसिटी अँक्ट सामाजिक संरक्षण होय, द्वेष नव्हे..

अँट्रोसिटी अँक्ट हाच नव्हे तर इतरही सर्व कायदे हे माणसाचे सामाजिक संरक्षण करणारे आहेत. म्हणून कोणत्याही कायद्याचा दुरुपयोग होणार नाही याची काळजी प्रत्येक नागरिकांनी घेणे आवश्यक आहे. देशामध्ये शांतता व सुव्यवस्था कायम राहुन जनकल्याण होण्यासाठीच कायद्याची निर्मिती केली जाते. कायदे हे जनहितासाठीच असतात परंतु कोणत्याही कायद्याचा दुरुपयोग नागरिकांकडून होऊ नये. जेने करून चुकिच्या वापरा मुळे निर्दोषांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहुन सामाजिक मानहानी होईल असे कोणतेही कृत्य कोणत्याही नागरिकांकडून चुकूनही होणे अपेक्षित नाही. त्या मध्ये अँट्रोसिटी हा का कायदा संवेदनशील आहे. म्हणून या कायद्याचा वापर योग्य त्या ठिकाणी योग्य त्याच प्रकरणात करणे गरजेचे आहे. अँट्रोसिटी कायदा हा समाजातील विषमता, द्वेष व अस्पृश्य मानसिकते मधुन बाहेर येण्यासाठी बनला आहे. म्हणजे या कायद्या मुळे समाजातील विषमता, द्वेष व अस्पृश्य भावना नष्ट करता येते परंतु या कायद्याचा दुरुपयोग होऊच नये यासाठी सर्वांना काळजी घेणे आवश्यक आहे. अँट्रोसिटी हा कायदा वैयक्तिक संसरक्षणाचा साठी नाही हे लक्षात घेणे गरजेचे आहे. अँट्रोसिटी अँक्ट हा अनुसुचित जातीच्या प्रवर्गात येणाऱ्या जातीचे संरक्षण करतो. तो वैयक्तिक माणसाचे संरक्षण करत नाही. म्हणून वैयक्तिक वादामुळे कधीच अँट्रोसिटी चा वापर होऊ नये किंवा वैयक्तिक वादाचा कधीच जातीशी संबंध जोडू नये. उठ सूट कधी ही अँट्रोसिटी चे गुन्हे दाखल करत बसु नये. कोणत्याही बाब अति केली की माती होत असते. उठ सुट अँट्रोसिटी, उठ सुट अँट्रोसिटी निकाल लागतो आरोपी निर्दोष सुटतो. अशा बाबीमुळे कायद्यावर प्रश्न चिन्ह उपस्थित तर होतेच परंतु जेथे खऱ्या अर्थाने अँट्रोसिटी ची आवश्यकता असते त्या ठिकाणी गांभीर्य राहत नाही. किंवा ती गोष्ट गांभीर्याने घेतली जात नाही. अँट्रोसिटी करायची नाही म्हणजे समाजात द्वेष, विषमता, जातीवाद नष्ट झाला असे मुळीच नाही. आणि सरकार ला माहिती आहे की समाजामध्ये आजही विषमता, जातीवाद आणि अस्पृश्य भावना असलेल्यांची संख्या आहे म्हणून तर तो कायदा आहे. परंतु कायदा आहे तर याचा अर्थ असा पण नाही ना प्रत्येक प्रकरण अँट्रोसिटी शी जोडावे. अँट्रोसिटी गुन्हा अंतर्गत शिक्षा झालेल्या लोकांची संख्या खुप कमी आहे. आणि निर्दोष सुटणाऱ्यांची संख्या खुप जास्त आहे. निर्दोष सुटण्यामागे दोनच कारणे असु शकतात ते एक म्हणजे तडजोड आणि दुसरे म्हणजे पुराव्याचा अभाव. या मधील तडजोड हे खुप घातक आहे. अँट्रोसिटी च्या नावाखाली गुन्हा दाखल करायचा आणि नंतर वैयक्तिक फायद्यासाठी तडजोड करायची असे जर होत असेल तर तो कायद्याचा अवमान तर आहेच परंतु जातीच्या नावाखाली स्वतः चा लिलाव आहे. स्वतःला च विकणे आहे. म्हणजे तडजोड करण्यासाठी किंवा द्वेषाच्या भावनेने राजकारण करण्यासाठी या कायद्याचा वापर अजिबात होऊ नये. जेने करून कायद्याचे गांभीर्य व महत्त्व कायम राहुन जातीवादी, विषमतावादी, अस्पृश्य मानसिकतेच्या लोकांवर दबाव राहुन मनात कायद्याची भिती राहील. परंतु चुकिच्या कींवा वैयक्तिक स्वार्थासाठी अँट्रोसिटी ला ढाल समजून समोरच्या वर वार करण्याचा प्रयत्न केला तर या कायद्याला काहीच महत्त्व उरणार नाही, याला कोणी गांभीर्याने घेणार नाही, परिणामी सरकार हा कायदा बंद करेल. कारण अगोदरच सांगितल्या प्रमाणे कोणताही कायदा जनकल्याण साठी असतो. आणि जनकल्याणाला अडसर ठरणाऱ्या घटकांना वठणीवर आणण्यासाठी कायदा असतो. अँट्रोसिटी च्या माध्यमातून केवळ तडजोड किंवा समोरच्या वर दबाव यावा म्हणून याचा वापर होणार असेल तर समोरचाही व्यक्तीच आहे, आणि समोरच्या व्यक्तीचे कल्याण करणेही आवश्यक आहे. म्हणून या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. कायद्याची बाजु बघताना आणि अँट्रोसिटी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करताना त्या मागचा उद्देश लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याचा उद्देश हा भेदभाव व अस्पृश्य मानसिकतेचा असेल तर नक्कीच गुन्हा दाखल व्हायला पाहिजे परंतु अनावधानाने एखाद्या शब्द, एखादे कृत्य घडले असेल तर इतरांचे ऐकुन या कायद्याचा वापर मुळीच करू नये. अँट्रोसिटी या कायद्याचा योग्य वापर केला तर समाजातील जातीवादी व निच माणसिकतेच्या लोकांना नक्कीच आळा बसेल. दुसरे कारण आहे ते म्हणजे पुराव्याचा अभाव. यासाठी सुद्धा समजात जनजागृती करणे आवश्यक आहे. इतर जातीतील लोकांनी सुद्धां जाती धर्माचा विचार न करता सत्य बाब मांडून जातीव्यवस्थेला व अस्पृश्य मानसिकतेला प्रोत्साहन देणाऱ्या विरूद्ध पुरावे देऊन न्यायीक भुमिका घ्यावी. म्हणजे समाजातील वाईट प्रवृतीना आळा बसेल. केवळ कायदा आहे म्हणून त्याचा कसाही वापर करून घ्यायचा आणि परिणाम शुन्य येत असेल तर कायद्याचे महत्त्व शुन्यच होणार या विषयी जागृत लोकांनी प्रबोधन करणे आवश्यक आहे. अँट्रोसिटी च्या माध्यमातून समाजातील हिन माणसिकता हानुन पाडायची आहे. ना की अँट्रोसिटी च्या नावाखाली कायद्याचे व संविधानाचे हसु करून घ्यायचे. ज्या ठिकाणी खरचं जातीय द्वेषातून प्रकरण घडते त्या प्रकरणाची योग्य बाजु मांडून दोषींना शिक्षा होईपर्यंत प्रकरण उचलून धरायला पाहिजे याचाच परिणाम बाकिच्यां वर कायद्याचा दबाव कायम राहील. येथे रोजच कुठे ना कुठे अँट्रोसिटी ची केस दाखल होते पण आरोपी निर्दोष सुटत असतील तर हा मात्र चिंतेचा विषय. आता अँट्रोसिटी चा वापर करताना ज्या गोष्टी खरचं अस्पृश्यता किंवा विषमता, जातीवाद कृतीतून किंवा बोलण्यातून दिसून येतो त्या कोणत्याही व्यक्तीवर करू शकतो. जसे सार्वजनिक ठिकाणी केवळ जातीच्या आधारावर प्रवेश दिला जात नाही,जातीच्या नावावर सार्वजनिक व नैसर्गिक साधन संपतीचा उपयोग करून घेता येत नाही, जातीच्या नावावर एखाद्या ठिकाणी घर, जमीन भाड्याने किंवा विकत घेता येत नाही, जातीच्या नावावर हलक्या प्रतीचे काम जाणीव पुर्वक करून घेतले जाते, जातीय द्वेषातून घराजवळ, शेतात घाण पदार्थ टाकले जातात, घराकडे, व्यक्ती कडे जातीय भावतेतुन बघुन तुच्छ भाषेचा वापर केला जातो, जातीच्या आधारावर ध्वजारोहण करण्यासाठी प्रतिबंध, मानसन्माच्या खुर्चीवर बसण्यासाठी प्रतीबंध होत असेल तर नक्कीच अँट्रोसिटी अँक्ट अंतर्गत गुन्हे दाखल व्हावे जेने करून कायद्याचा धाक व दबाव कायम राहून समाजात शांतता, सुव्यवस्था सोबतच समता प्रस्थापित होईल. वरील बाबी केवळ मी उदाहरणा दाखल सांगितल्या आहेत, विधीचा विषयाचे शिक्षण घेतले नाही प्राथमिक बाबी केवळ लोकांना समजण्यासाठी मांडल्या आहेत. म्हणुन त्या मागचा भाव लक्षात घेणे आवश्यक आहे. जातीमुळे जर कोणी हीन वागणूक देऊन एखाद्याला अपमानीत करत असेल तर त्या व्यक्तीवर नक्कीच गुन्हा दाखल व्हावा. परंतु काही वैयक्तिक प्रकरणे, वैयक्तिक वाद याचा संबध जातीशी जोडून अँट्रोसिटी चा वापर करणे चुकिचेच आहे. अँट्रोसिटी च्या संपूर्ण केसेच चुकिच्याच आहेत असे मुळीच नाही परंतु निर्दोष सुटणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने याचा गैरवापर होतो हे सुद्धां नाकारता येत नाहीत. ज्या प्रमाणे आपण आपल्या घराला जपतो, कारण ते घर आपले उन वारा पाऊ या पासून संरक्षण करते. घर आपले संरक्षण करते म्हणून आपणही घराचे संरक्षण करतो. त्याची योग्य रंगरंगोटी करतो, स्वच्छ ठेवतो कारण ते आपले संरक्षण करते. त्याच प्रमाणे अँट्रोसिटी अँक्ट सुद्धां आपले सामाजिक संरक्षण करते. म्हणुन या कायद्याचे संरक्षण करणे, या बद्दल कोणी चुकीचे वक्तव्य करेल, कायद्याचा आधार घेऊन वैयक्तिक तडजोड करेल, आणि या माध्यमातून कायद्याला कमकुवत करून त्याचे महत्त्व कमी करत असेल तर अशा प्रवृतीना आपण वठणीवर आणणे आवश्यक आहे. उच्च जातीमधील लोकांनी सुद्धां जातीच्या नावाखाली आपल्या जातीतील लोकांचे संरक्षण करू नये. मुळात मानवी विकासासाला अडचणच जातीवाद आणि कट्टरता आहे. जाती धर्माच्या नावाखाली जर गुन्हेगारांचे किंवा चुकिच्या लोकांचे समर्थन किंवा त्यांच्या चुका लपवून ठेल्या तर ती प्रवृत्ती जास्तच वाढत जाणार. म्हणून कोणत्याही चुकिच्या गोष्टीचे समर्थन जात धर्म बघुन नाही तर त्याची वृत्ती बघुन व्हायला पाहिजे तरच समाजातील चुकीच्या प्रवृत्ती नष्ट व्हायला सुरुवात होईल. अँट्रोसिटी अँक्ट चा वापर खरोखरच जिथे आवश्यकता आहे तिथेच करून शिक्षा होईपर्यंत प्रकरण उचलून धरले तर इतर लोकांची जातीवाद करण्याची हिंमत होणार नाही. आणि अँट्रोसिटी मध्ये शिक्षा होतेच हा सकारात्मक संदेश समाजात जाऊन तडजोड होणार नाही. थोडक्यात काय तर वैयक्तिक हितासाठी कोणीच या कायद्याचा वापर कोणीच करणार नाही. कारण अँट्रोसिटी अँक्ट हा कायदा समाजातील लोकांना सामाजिक संरक्षण देतो, त्यामुळे या कायद्याच्या आधारे समाजात द्वेष निर्माण होणार नाही याची काळजी जागृत नागरिकांनी व या कायद्या अंतर्गत बाजु मांडणाऱ्या कायदे तज्ञांनी घेणे आवश्यक आहे. तरच चुकिच्या घटनेवर आळा बसुन सामाजिक समता प्रस्थापित होईल.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**मोबा:** ९१३०९७९३००

पान १ वरुन

### चांद्रयान–३ चंद्रापासून अवघ्या ..

लागेल आणि लँडिंग साईटवर सूर्योदयाची प्रतीक्षा करावी लागेल. २३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी सुमारे ४५ मिनिटांनी ते उतरणे अपेक्षित आहे.

या डीबूस्टिंगसह, विक्रम लँडर चंद्राच्या सर्वात खालच्या कक्षेत पोहोचला आहे. त्यानंतर आता त्याचे चंद्रापासून किमान अंतर फक्त २५ आणि कमाल अंतर १३४ किलोमीटर आहे. चांद्रयान–३ आता फक्त चंद्राच्या पृष्ठभागावर सूर्योदयाची वाट पाहत आहे. सध्या चंद्रावर रात्र असून २३ तारखेला सूर्योदय होईल. विक्रम लँडर सूर्यप्रकाश आणि शक्ती वापरून आपले ध्येय पुढे नेणार आहे. दोन्ही रोव्हर वीज निर्मितीसाठी सौर पॅनेल वापरतील.

चंद्राचा पृष्ठभाग असमान आणि खड्डे, दगडांनी भरलेला आहे. अशा पृष्ठभागावर उतरणे धोकादायक ठरू शकते. चंद्रावर उतरण्यापूर्वी शेवटच्या काही किलोमीटरमधील परिस्थिती सर्वात धोकादायक असते कारण त्यावेळी अवकाशयानाच्या जोरातून वायू बाहेर पडतो. या वायूंमुळे, चंद्राच्या पृष्ठभागावरून मोठ्या प्रमाणात धूळ उडते, ज्यामुळे ऑनबोर्ड संगणक आणि सेन्सर खराब होऊ शकतात किंवा गोंधळात टाकतात. त्यामुळे या आव्हानांचा सामना केल्यानंतरच सुरक्षित लँडिंग होईल.

विक्रम लँडरचे पाय अतिशय मजबूत करण्यात आले आहेत. विक्रमला मोठ्या खड्ड्यात उतरावे लागले तर त्याला कोणतीही अडचण येणार नाही. लँडरच्या बाहेर एक विशेष कॅमेरा बसवण्यात आला आहे. याला लेसर डॉपलर वेलोसिमीटर म्हणतात. या लेझरचा प्रकाश चंद्राला सतत स्पर्श करेल. इस्रोच्या नियंत्रण कक्षात बसलेल्या शास्त्रज्ञाचे त्यावर पूर्ण नियंत्रण असेल.

### ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा

रतन टाटा, उद्योगमित्र पुरस्कार सिरम इन्स्टिट्यूटचे अदर पुनावाला यांना तर उद्योगिनी पुरस्कार किर्लोस्कर समूहाच्या गौरी किर्लोस्कर, उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्कार विलास शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे. हे पुरस्कार उद्या रविवारी (दि.२० ) समारंभपूर्वक राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. हा समारंभ वांद्रे–कुर्ला संकुलमधील जीओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमधील जास्मिन हॉलमध्ये दुपारी दोन वाजता होणार आहे. ‘उद्योगमित्र’ पुरस्काराचे स्वरूप १५ लाख, सन्मानचिन्ह व मानपत्र, उद्योगिनी’ पुरस्काराचे स्वरूप ५ लाख, सन्मानचिन्ह व मानपत्र तर ‘उत्कृष्ट मराठी उद्योजक’ पुरस्काराचे स्वरूप ५ लाख, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे आहे.

### ‘ज्यांचे फोटो लावतो, त्यांनी किती..

कारण आजकाल सोशल मीडियातील सर्व गोष्टी खऱ्या नाहीत. अनेकदा त्यातून फसवणूक देखील होते. शाळेत देखील याबाबत जनजागृती होणे आवश्यक असून शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. याच उदाहरण म्हणजे सिंगापूरमध्ये प्राईम मिनिस्टर नंतर २ नंबरचा मंत्री शिक्षण मंत्री असतो, असेही भुजबळांनी सांगितले. शाळेच्या आठवणी ताज्या करताना भुजबळ म्हणाले की, आजच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांची परेड पाहून आनंद वाटला. मी पहिल्यांदा म्युनिसिपल शाळेत शिकलो. त्यावेळी मला एका महिला शिक्षिकेने शिकवलं, तसेच मी नेवल छउउ मध्ये प्रमुख कॅडेट होतो. आजचा कार्यक्रम, विद्यार्थ्यांची तयारी पाहून पुन्हा लहान व्हावं वाटलं. आज एकीकडे हा कार्यक्रम होत असताना दुसरीकडे राज्यातीलच नव्हे देशातील उद्योग क्षेत्रातील महत्वाचे नाव असलेल्या रतन टाटा यांचा उद्योग रत्न म्हणून सन्मान करण्यात आला. आजही ते त्यांच्या कामाप्रती प्रामाणिक असून टाटा गृप कमावतो, त्यापेक्षा ८० टक्के दान करतात, असे म्हणत टाटा ग्रुपचे कौतुक केले.

संभाजी भिडेंचे खरे नाव मनोहर कुलकर्णी असून ब्राह्मण समाजात कोणीही शिवाजी, संभाजी नाव ठेवत नाही. त्यामुळे इतिहास मोडणाऱ्यांविरोधात आपल्याला उभ राहावं लागेल. ज्यांचे आपण फोटो लावतो, त्यांनी किती शाळा केल्या. त्यांनी सर्वांना का नाही शिकवलं, असा प्रश्न उपस्थित करत आपण आपले देव ओळखायला शिका, असा सल्ला भुजबळांनी दिला. बाबासाहेबांनी सांगितलं शिका आणि सत्तेत सामिल व्हा. बाबासाहेब सत्तेत सामिल झाले आणि आपल्याला संविधान मिळालं. आज सरकारच्या माध्यमातून अनेक योजना लागू करण्यात आल्या आहेत. यात ५० हजार रुपये जमीन खरेदी योजनेतून देणार आहेत. या योजनेचा लाभ घ्या, अनेक योजना अजित दादा तिथल्या तिथे पार पाडत आहेत. निवडणुकीवेळी काहीही करा, मात्र शासनाच्या सर्व योजनांचा लाभ घ्या, असे आवाहन छगन भुजबळ यांनी केले.

### भारतीय लष्कराचं वाहन..

दऱ्याखोऱ्यांचा आणि अवघड घाटांचा हा भाग रहदारीसाठी अवघड आहे. हा भाग एलएसीजवळ असल्याने येथे अत्यंत चोख सुरक्षा व्यवस्था आहे. भारतीय लष्कराच्या अनेक रेजिमेंट्स सध्या लेह भागात आहेत. सीमेवर चीनबरोबर सुरू असलेला तणाव लक्षात घेता या भागात सैनिकांची संख्या वाढवण्यात आली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या अपघातानंतर शोक व्यक्त केला आहे. त्यांनी ट्विट केलं आहे की लडाखमधील लेहजवळ झालेल्या अपघातात भारतीय सैन्यदलातील जवानांच्या मृत्यूच्या बातमीने मी दुःखी झालो आहे. या जवानांनी आपल्या भारतमातेची केलेली सेवा आम्ही कधीच विसरणार नाही. या बिकट परिस्थितीत मी शहीद जवानांच्या कुटुंबांबरोबर आहे. जखमी जवानांना फील्ड हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे. हे जवान लवकरात लवकर बरे होवोत अशी मी प्रार्थना करतो.

### गोविंदांना मिळणार विमा..

या सभेला उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. ही सभा रद्द झाल्याबाबत माध्यमांवर येणाऱ्या बातम्या पूर्णपणे चुकीच्या असून माध्यम प्रतिनिधींनी कृपया खात्री केल्याशिवाय सभेबद्दल अशा चुकीच्या व निराधार बातम्या देऊ नयेत, ही विनंती, असे ट्वीट धनंजय मुंडे यांनी केलेय.

### अजित पवार सत्तेत गेले याची ..

करायचे, पण आता असं काही घडत नाही. उगाच फडतूस ब्रेकिंग न्यूज चालवतात. काय तर राज ठाकरे घरातून निघाले. असं म्हणत राज ठाकरेंनी  चिमटाही काढला.

राज ठाकरे यांनी पत्रकारांकडून दिल्या जाणाऱ्या चुकीच्या बातम्यांवरही भाष्य केलं. तसेच त्यांनी पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांबाबत चिंताही व्यक्त केली. यावेळी राज ठाकरे म्हणाले, हल्ला कुणावरही होऊ नये. पण हल्ला झाल्यावर जसा पत्रकारांना राग येतो, तसा आम्हालाही (राजकीय व्यक्तींना) राग येतो असं राज ठाकरे म्हणाले. पुढे ते म्हणाले, पत्रकार मला म्हणतात, तुमच्या सभांना गर्दी होते, पण मतं मिळत नाहीत. आता तुम्ही पत्रकार आहात, म्हणजे तुम्ही काय आमचे वाभाडे काढणार का? राज ठाकरे आहे मी, हे मी खपवून घेणार नाही. मी यावर व्यक्त होणारच.पत्रकारांना उद्देशून राज ठाकरे पुढे म्हणाले, तुमचं काम आमचे डोळे उघडणं आहे. तुमचं काम आम्हाला चिमटे काढणं आहे. तुमचं काम प्रबोधन करणं आहे. जर समजा आम्ही काही चुकीची पावलं टाकत असू तर आम्हाला सुधरवणं, हे तुमचं काम आहे. विनाकारण खोट्या बातम्या देणं चुकीचं आहे. नको त्या बातम्या करणाऱ्या पत्रकारांवर तुमची संघटना काय कारवाई करणार आहे का? हे सांगावं. बाकी इतर बाबतीत राज ठाकरे तुमच्यासोबत आहे.

### गोविंदांना मिळणार विमा..

वरळीच्या डोम या ऑडिटोरियममध्ये प्रो–गोविंदा स्पर्धेचं आयोजन राज्य समन्वय समितीद्वारा करण्यात येणार आहे, या समितीस शासनाने मान्यता दिली आहे. दहिहंडी उत्सवादरम्यान गोविंदांना मानवी मनोरे रचताना अपघात होण्याची शक्यता असते. काही वेळा गोविंदा पथकातील गोविंदांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू घडून येतो किंवा गंभीर दुखापत होऊन त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. परिणामी अपघातग्रस्त गोविंदांना आणि त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक विवंचनेला सामोरं जावं लागतं. या अनुषंगाने गोविंदांना विमा संरक्षण देण्यासाठी ओरिएन्टल इन्शुरन्स विमा कंपनीच्या माध्यमातून ५० हजार गोविंदांना प्रति गोविंदा रु. ७५ चा विमा हप्ता याप्रमाणे एकूण रु. ३७,५०,००० इतका निधी संबंधित विमा कंपनीस अदा करण्यात आला आहे. मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास दहा लाख रुपयांचा विमा देण्यात येणार आहे.उद्योग मंत्री उदय सामंत हे महाराष्ट्रातील ठाणे आणि मुंबईच्या औद्योगिक विकास महामंडळद्वारे आठ थराच्या आणि नऊ थराच्या गोविंदा पथकाला आर्थिक सहाय्य करणार आहेत. आर्थिक सहाय्यासाठी १ कोटी रुपये उपलब्ध करून देणार आहेत.

जिल्हा नियोजन समिती मुंबई शहरामार्फत पालकमंत्री दीपक केसरकर यांच्याकडून नाविन्यपूर्ण योजनेमधून दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.दहीहंडी हा आपला पारंपारिक मराठी उत्सव असून आज या उत्सवाचं स्वरूप हे साहसी खेळ म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होत आहे. प्रो–गोविंदाच्या माध्यमातून दर्जेदार खेळाडू तयार होतील.`.

## कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त अंगणवाडीत आरोग्य शिबिर संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधी : माजी आमदार कर्मवीर सुधाकरपंत परिचारक यांच्या तृतीय पुण्यस्मरण निमित्त आज पंढरपूर येथील जेवण तेली समाज मठ येथील अजय नगरसेवक अंबादास धोत्रे सूर्योदय फाउंडेशन यांच्यावतीने अंगणवाडी मधील मुलींचे आरोग्य निदान शिबिर घेण्यात आले



त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग तसेच नागरिकांसाठी मोफत मोतीबिंदू स्त्रिया शिबिर करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख अतिथी युट्र पी एन शुगरचे चेअरमन परिचारक उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर महेश कुमार माने तुमच्यासह डॉक्टर मंदार सोनवणे, माजी नगरसेवक साहेब चौगुले माजी नगराध्यक्ष नागेश भोसले शिवाजी कोळी सागर यादव श्रीनिवास बोरगावकर राजाभाऊ गोसावी राजाभाऊ कौलवार बाबुराव पावले डॉक्टर प्रदीप तिचे किरण मासाळ सुनील भिंगे नंद कुमार कटप लखन चौगुले इत्यादी उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बोळेगाव येथे स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहण



वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील बोळेगाव येथे ग्रामपंचायत तिच्या प्रागणात दि.१५ आँगस्ट स्वातंत्र्य मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला असून स्वातंत्र दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय तिरंगा ध्वजारोहण करण्यात आले.

प्रारंभी सरपंच विलास पाटील, उपसरपंच शांताप्पा मुलगे व सर्व ग्रा.प.सदस्य यांच्या हस्ते राष्ट्रपती महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करून सरपंच विलास पाटील यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी माजी सैनिक, स्वातंत्र्य सैनिकांचा ग्रा.प.च्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रा.प.सदस्य सुनील सुरवंशी,अंकुश रुपनूर,इंद्रायणी रुपनूर, रामलिंग गायकवाड, पोलीस पाटील कडाजी सुरवसे,मारूती सुर्यवंशी, बाळासाहेब पाटील, गुलचंद रूपनूर,वसंत धायगुडे, राम बंडगर,शाहूराज खंदारे, रमेश बनसोडे, व्यंकट मदने, महादेव काळे, काशिम इनामदार, मारुती बनसोडे, धर्माण्णा कंटेकुरे,विनोद कांबळे, प्रकाश सुर्यवंशी सह जि.प.प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, ग्रामस्थ,महिला उपस्थित होते.

# बुद्धनगर भागात निकृष्ट दर्जाचा सिमेंट रस्ता बनवणाऱ्या ठेकेदारावर नगर प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी

## दोन्ही बाजूच्या गटारी मात्र ठेकेदारानी आमोवश्याच्या रात्री चक्क गिळाल्या जबरी भुकेचा प्रताप

नळदुर्ग /दादासाहेब बनसोडेः नळदुर्ग शहराच्या विकास आराखड्यात शहरातील दलित वस्तीमध्ये बुद्धनगर भागात शासकीय गोडाऊनच्या समोरील बाजू लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत नळदुर्ग शहरातील विकास कामांना गती देण्यासाठी व या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा उभी केली जाते कारण नळदुर्ग शहरात गतवर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत झालेल्या जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग ते शासकीय गोडाऊन समोरील अक्कलकोट रस्ता नजीक या काम अंदाजे किंमत ५२ लाख रुपये एवढी असताना दिनांक २ नोव्हेंबर २०२२ रोजी रात्रीच्या वेळी ८ : ३० च्या दरम्यान रात पाळीने ठेकेदार काम करत असल्याचे उघडकीस आल्याने सदरील काम तात्काळ तेथील पत्रकार दादासाहेब बनसोडे आणि काही सुजाण नागरिक गेले असता रात्रीच्या वेळी काम करताय विचारणा केली असता आम्ही काँक्रीट अंतरून घेतोय असे म्हणत ते सदरील काँक्रेट रस्ता तात्काळ बंद करण्यात आला याचा पुरावा सुद्धा आहे .

परंतु हा रस्ता शासकीय स्तरावरील नगर परिषदेच्या अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत अंदाजे किम्मत ५२ लाख रुपयेचा आसुन याच रस्त्याला दोन्ही बाजूला गटारी होत्या परंतू ठेकेदाराला आमवथ्याच्या रात्री जबरी भुक लागली होती म्हणुन त्या दोन्ही बाजुच्या गटारी मात्र चक्क गिळाल्या आहेत

ऐवढे भक्कम पुरावे आसताना नगर परिषद मात्र मुग गुळुन गप्प का आहे आशा गुत्तेदारावर कारवाई का करित नाही आशा गुत्तेदाराला नगर परिषद पाठीशी का घालतेय तेरी भी चुप मेरी भी चुप म्हणत गाव विकासात दलित वस्तीतील निकृष्ट दर्जाचा हा रस्ता दलित वस्तीचा असताना हा दलित वस्तीत काम चालू आहे हे



माहीत असताना सुद्धा ठेकेदाराने दलितांचा किंवा तेथील नागरिकांचा कसला ही विचार न करता निकृष्ट दर्जाच्या कामाची मालीका मात्र चालूच ठेवली परंतु निकृष्ट दर्जेच्या कामावर रात्री ८:३० च्या सुमारास एकही अधिकारी दिसलेला नाही .

दलित वस्तीतील जनता रोज कबाड कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असते दिवसभर कवाड कष्ट करून आलेल्या मजुर मात्र रात्रीची शांत झोप घेतो मग झोप केव्हा लागली हे माहिती होत नाही त्या भोळ्या नागरीकांचा फायदा घेत नगर पालिकेच्या ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम जी सी पी द्वारे करून गरीब नागरीकावर मज्जाव केला .अशा गुत्तेदारावर ट्रॉसिटी क्टनुसार कारवाई का करण्यात येऊ नये अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे

तात्काळ नगरपालिकेचे कर्मचारी यांना दूरध्वनीवरून विचारणा केली असता सदरील ठेकेदारास त्या ठिकाणी पाठवून देऊन ते काम तात्काळ बंद करण्यात आले एवढे असताना नळदुर्ग शहरातील नगरपालिकेच्या शासकीय कर्मचाऱ्यांनी या कामाकडे चक्क पाठ फिरवली होती मग नळदुर्ग शहराचा विकास कसा होणार विकास गतीमान करण्यासाठी नागरीकानी पुढाकार घेतला पाहिजे . मग शहराचा विकास करू म्हणणारे सुजान नागरिक किंवा लोकप्रतिनिधी याना आसे कामे होत आसताना झोपी लागल्या होत्या का ? जाणून बुजून दलित वस्तीतल्या कामाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून आले आहे .

आजही त्या रस्त्याची खूप मोठी दुरावस्था झाली आहे शासकीय गोडाऊनच्या समोरील भाग अर्धवट ठेवून ठेकेदार पळून गेला की काय असा संभ्रम जनतेत होत आहे कोणताही अभियंता किंवा कर्मचारी असो याकडे फिरकले सुद्धा नाहीत हे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून संबंधित काही संस्था मात्र हे काम गुणवत्ता धारक असल्याचे पत्र देते या संस्थेने प्रत्यक्ष दर्शी येऊन चौकाशी केली आहे का अशा माथेफिरू ठेकेदार संस्थांवर अनुसूचित जाती प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा नोंद करून अशा गुत्तेदाराचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात यावे . असे अनेक कामे नळदुर्ग शहरांमध्ये निकृष्ट दर्जाचे झालेले आहेत . आशा अनेक कामावर कोटावधीचा निधी उधळला जातोय या कोट्याधीश निधीला जबाबदार कोण प्रशासन की जनता परंतू नळदुर्ग शहराच्या विकास आराखड्या मध्ये अनेक कामाला कोट्यावधीचा निधी मंजूर झाला आणी तो खर्च करण्यात आला परंतु नळदुर्ग या ऐतिहासिक शहरांमध्ये दलित वस्तीत बुद्धनगर भागामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी सुधार वस्ती योजनेअंतर्गत शासकीय गोडाऊनच्या समोर अक्कलकोट रोड ते जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग प्रवेशद्वारा पर्यंत सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात आले याची अंदाजे किंमत ५२ लाख एवढी होती या अंदाजे किमती एवढे काम तरी झालेच नाही परंतु याच ठेकेदाराने रात्रीच्या सुमारास काम करून दलित वस्तीतील जनतेची आणि प्रशासनाची चक्क फसवणूक केल्याचे उघड झाले आहे

यासाठी दलित वस्तीत काम करणाऱ्या ठेकेदारावर नगरपालिका काय कारवाई करणार याकडे नागरीकांचे लक्ष लागले आहे .

अन्यथा नळदुर्ग शहरातील दलित नागरिक या काँक्रीट रस्त्याच्या विरोधात ठेकेदाराविरुद्ध अनुसूचित जाती प्रतिबंध कायद्याखाली गुन्हा नोंद करण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ सचिन ओम्बासे यांच्याकडे एक निवेदन देऊन संबधीत ठेकेदारावर दलित जनतेची व प्रशासनाची फसवणूक केल्याच्या संदर्भात प्रशासनाने ठेकेदारा विरुद्धात गुन्हा नोंद करावा अशा प्रकारचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येणर आहे . असे नाही झाल्यास नगर परिषदे समेर अंदोलन व उपोषण करण्यात येणार आहे

# टाकळीवाडी येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर शाळेला संरक्षण भिंतीची आवश्यकता

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्या मंदिर येथे मोकाट जनावरांचा त्रास वाढला. जनावरे सरळ शाळेच्या आवारामध्ये येत आहेत. या शाळेमध्ये




१ली ते ७वी पर्यंत २५४ एकूण विद्यार्थी, विद्यार्थिनी आहेत. तसेच शाळेला लागूनच अंगणवाडी शाळा सुद्धा आहे. विद्यार्थ्यांच्या मध्ये भितीचे वातावरण पसरलेले आहे. वारंवार वृक्षारोपण शाळेसमोर करावे लागत आहे. मोकाट जनावरे शाळेचे आवारामध्ये येत आहेत. मोकाट जनावरांचे झुंजी या शाळेसमोर चालत आहेत.मोकाट जनावरांपासून विद्यार्थ्यांना धोका निर्माण झालेला आहे. मोकाट जनावरांपासून विद्यार्थ्यांना दुखापत होऊ शकते किंवा एखादा हल्ला होऊ शकतो हे नाकारता येत नाही. शिक्षक, विद्यार्थी, पालक, वर्गामध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे. तसेच संरक्षण भिंत नसल्यामुळे अनेक वृक्ष लागवडीला सुद्धा बंधन येत आहेत. या पूर्वी अनेक वृक्ष लागवड या शाळेने केलेली होती .परंतु मोकाट जनावरांच्या मुळे ती नष्ट झालेली आहेत. शाळेला संरक्षण भिंतीची फार आवश्यकता आहे. तरी त्वरित संरक्षण भिंत बांधावी. असे ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.



# प्रा.डॉ.आनंद आहिरे यांना नेपाळचा गांधी शांतता पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान

## गांधी पीस फाउंडेशन नेपाळची मानद डॉक्टरेट प्रा.डॉ. आनंद आहिरे यांना प्रदान व ब्रँड अँबेसिडर म्हणून नियुक्ती



नाशिक/प्रतिनिधी :आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी येथे प्रा.डॉ. आनंद आहिरे यांना गांधी पीस फाउंडेशन नेपाळ चा गांधी शांतता पुरस्कार व मानद डॉक्टरेट,गांधी पीस फाउंडेशन नेपाळचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. एल. बी.राणा यांनी सन्मानपूर्वक प्रदान केली व ब्रँड अँबेसिडर म्हणून डॉक्टर आनंद आहिरे सरांची नियुक्ती केली.

प्रा. डॉ.आनंद रत्नाकर आहिरे हे आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी, अशोक स्तंभ नाशिक चे संस्थापक, संचालक असून मागील १२ वर्षात त्यांनी १४९७ विद्यार्थी वरिष्ठ महाविद्यालयास प्राध्यापक म्हणून नेट/सेट परीक्षेत उत्तीर्ण केले असून ३६९ च्या वरती विद्यार्थी महाराष्ट्र पोलीस कॉन्स्टेबल म्हणून उत्तीर्ण केले आहेत. तर २०० च्या वरती विद्यार्थी प्रशासकीय अधिकारी म्हणून उत्तीर्ण केलेले आहेत. मागील १२ वर्षात महाराष्ट्राच्या खेडोपाड्यात,कानाकोपऱ्यात जाऊन ९६ हजार विद्यार्थ्यांना विनामूल्य स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले आहे. तसेच पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे ते अध्यक्ष असून या संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक कार्यामध्ये दैदिप्यमान कामगिरी त्यांनी केलेली आहे. गोर, गरीब,गरजू व अपंग विद्यार्थ्यांना ते विनामूल्य मार्गदर्शन करतात.या सन्मान सोहळ्यानिमित्त पुष्परत्न साहित्य समूह अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी या विषयावर कवी संमेलनाचे आयोजन केले होते. या कवी संमेलनाचे अध्यक्ष माननीय पुष्पराज गावंडे, सदस्य, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ हे होते. महाराष्ट्र व नाशिक जिल्ह्यातील कवी कवयित्रींनी आपल्या स्वरचित राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या जीवनावर बहारदार कविता सादर केल्या. विडंबनकार संजय आहेर ,स्नेहा शिंपी, मगनलाल बागमार, अर्चना मेढेवार छत्रपती संभाजी नगर, रचना चिंतावार, राजेंद्र चिंतावार, शीला पाटील, प्राध्यापक रवींद्र पाटील, कविता बिरारी, सुभाष उमरकर, सुभाष शेलार, मनीषा बिराडे जळगाव, विश्वनाथ साठे, संध्यारजनी सावकार, गोरख पालवे, लोकनाथ जाधव, अरुण पाल, दत्तू दाणी, योगेश सोनवणी,मयूर सोनार, भूषण केदार, डॉ.सुनील परदेशी व इतरांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला होता. व कविता सादर केल्या. सर्वांना अध्यक्षांच्या हस्ते कविता सादरीकरणानिमित्त सहभाग सन्मानपत्र देण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन मा.माधुरी सूर्यवंशी नाशिक यांनी केले.

# सोनके तलावात लवकरात लवकर पाणी सोडावे अन्यथा आंदोलन करणार : चेअरमन अभिजीत पाटील

पंढरपूर/प्रतिनिधी :सोनके तलाव लवकरात लवकर भरून घ्यावा यासाठी मा.जलसंपदा विभाग पंढरपूर येथील अधिकारी यांना राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट), तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थित निवेदन दिले.

माझा बळीराजा शेतकरी तळहाताच्या फोडाप्रमाणे आपल्या शेतात सोनं पिकवतो आणि पाण्यावाचून पिकं डोळ्यासमोर जळून जातात.त्यामुळं निरा भाटघर कालव्यातून सोनके तलाव भरुन मिळावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला.यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानाजी काका बागल,शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते रणजीत बागल, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक नेते सचिन आटकळे, पिराजी कुरोली चे माजी सरपंच कुलदीप कोलगे, समर्थ साठे यांसह आदी उपस्थित होते




# अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे हददीतील भारत सेवा, स्वातंत्रासाठी व सुरक्षेसाठी बलीदान देणारे कुटुंबांचा सन्मान

अक्कलकोट/प्रतिनिधी : १५ ऑगस्ट स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव सांगता वर्ष समारोह निमित्त मेरी मिट्टी मेरा देश अभियान अंतर्गत अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे हददीतील भारत देशासाठी स्वातंत्रासाठी व सुरक्षेसाठी बलीदान देणारे कुटुंबांचा सन्मान करून १५ ऑगस्ट या सणांचा जल्लोषात स्वागत करण्यात आला.कोरोना या संसर्गजन्य रोगाची साथ पसरली तेंव्हा कर्तव्य बजावताना कोरोना आजाराने मयत झालेले पोलीस पाटील कै. शिवलींग रामकृष्ण निंबाळ यांचे विर पत्नी जगदेवी निंबाळ यांचा आणि भारत देशासाठी स्वातंत्रासाठी व सुरक्षेसाठी बलीदान देणारे शहीद बसवराज बकुंडगी, शहीद मधुकर व्हटकर, शहीद मोहन ठाकरू चव्हाण, शहीद परमानंद शिवाजी माने, स्वातंत्रसैनिक रामा गायकवाड यांच्या परिवारातील सदस्य यांचा उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार व पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांचे हस्ते शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आले. तसेच पोलीस ठाणेकडील ठाणे अंमलदार दालन मध्ये शिवशंभो ब्लड सेंटर मोहोळ जि. सोलापूर यांचे मार्फत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. एकूण २३ जणांनी रक्तदान केले. मौजे मैंदर्गी ता. अक्कलकोट येथे हालहळळी गावाकडे



जाणारे रोडलगत असलेल्या मोकळया जागेत मैंदर्गी येथील ग्रामस्थांचे वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ग्रामस्थांचे मदतीने सुमारे २०० वृक्षांचे रोपण केले. अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक काळे गोपनीय शाखेचे अल्ताफ शेख व दादासाहेब बोडके,बाडीवाले, काळे, धायगुडे, गोपनीय अंमलदार पोहेकॉ अल्ताफ शेख, पोहे अजय भोसले, सुभाष दासरे, रफिक शेख,मियावले, व पोलीस पाटलाचे भाऊ हावणा निंबाळ सह आदि जण बहुसंख्येने उपस्थित होते

# देवभूमी आणि संतभूमी असणारे शहरातील स्थानिक नागरिकांच्या सेवा सुविधांसाठी



**देवभूमी आणि संतभूमी अशी सांप्रदायिक असणाऱ्या पंढरपूर व मंगळवेढा शहरातील स्थानिक नागरिकांसाठी आमदार समाधान आवताडे यांनी बहुतेक सोयी सुविधा सक्षम करण्यासाठी व शहरवासी यांचे जीवनमान उंचावण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून दोन्ही नगरे परिषदेसाठी उपलब्ध केलेला हा निधी दोन्ही शहरांच्या सर्वांगीण प्रगतीचा सर्व समावेशक सेवा सूत आहे आमदार समाधान आवताडे यांनी विकासाची व्यापक दृष्टी मतदारसंघाची प्रगती आलेख समृद्धी आणि विकसित करेल**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य सरकार मूलभूत तथा वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत विशेष अनुदान म्हणून पंढरपूर व मंगळवेढा नगरपरिषदेसाठी विविध विकास कामांना दहा कोटी रुपये मंजूर झाला

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी प्रसिद्ध पत्रकार द्वारे दिले आहे मंजूर झालेल्या या निधीमध्ये मंगळवार नगर परिषदेसाठी पाच कोटी व पंढरपूर नगर परिषदेसाठी पाच कोटी एवढा निधी आहे आ. अवताडे यांच्या प्रयत्नातून मंजूर सदर निधी मुळे पंढरपूर व मंगळवेढा शहराच्या विविध विकास कामास जालना मिळणार आहे

सदर वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून निधी उपलब्ध होण्याकामी आमदार समाधान आवताडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे साहेब उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे प्रत्यक्ष पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता देशातील एक महत्त्वपूर्ण आणि खूप मोठी आध्यात्मिक परंपरा असलेल्या पंढरपूर व मंगळवेढा शहरासाठी निधीमुळे बहुतेक सुख सुविधा सक्षम व्यापक होणार आहेत

# शासन आपल्या दारी' कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म पातळीवर नियोजन

पंढरपूर/प्रतिनिधी : शासनाच्या विविध कल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी शासन आपल्या दारी हा महत्वकांक्षी कार्यक्रम शासनामार्फत राबविण्यात येत आहे. शासन आपल्या दारी अभियानातर्गंत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थित २६ ऑगस्ट रोजी पंढरपूर तालुक्यात जिल्हास्तरीय कार्यक्रम नियोजित असून, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासनान अतिशय सुक्ष्म पातळीवर नियोजन करीत असल्याचे प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी सांगितले.



शासन आपल्या दारी उपक्रमाबाबत पुर्व नियोजन आढावा बैठक प्रांताधिकारी कार्यालय पंढरपूर येथे घेण्यात आली. बैठकीस मोहोळचे प्रांताधिकारी अजिंक्य घोडगे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, अपर तहसिलदार तुषार शिंदे, मुख्याधिकारी अविंद माळी, कार्यकारी अभियंता श्री. निंबकर, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री तसेच संबधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी गुरव म्हणाले, जिल्ह्यातील सर्व विभागांच्या शासकीय योजना गतिमान करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यात शासन आपल्या दारी हे अभियान राबविण्यात येत आहे. 'शासन आपल्या दारी' जिल्हास्तरीय कार्यक्रमात जिल्ह्यातील ४० हजाराहून अधिक लाभार्थ्यांना थेट लाभ देण्यात येणार आहे.कार्यक्रमासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांची वाहतूक व्यवस्था, भोजन व्यवस्था, कार्यक्रमस्थळी स्वच्छता, जलरोधक मंडप उभारणी, बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वाहनतळ, आरोग्य पथक आदीच्या व्यवस्थेची जबाबदारी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात येणार आहे. पंढरपूर तालुक्यातील सर्व शासकीय विभागांनी आपल्या विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध योजनांची अचूक माहितीसह लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येत आहे. 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ उपलब्ध करून द्यावयाचा असल्याने सर्व विभागाने त्या दृष्टीने परिपूर्ण नियोजन करून कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच या कार्यक्रमासाठी वयोवृध्द नागरिक, दिव्यांग नागरिक, लहान मुले, गर्भवती महिला यांना आणू नये असे आवाहनही प्रांताधिकारी गुरव यांनी यावेळी केले.

# स्वेरीची शैक्षणिक वाटचाल अभिमानास्पद :आ.राम सातपुते

## स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ थाटात संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधी : 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण मिळावे या उदात्त हेतूने अत्यंत हालअपेष्टा सहन करत आणि स्वतःला चंदनाप्रमाणे झिजवून अनेक अडचणींतून मार्ग काढत डॉ. बी.पी. रोंगे सरांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षणाचे द्वार खुले केले. विद्यार्थ्यांच्या उज्वल करिअरच्या दृष्टीने संस्थेच्या स्थापनेपासूनच अनेक नवनवीन उपक्रम राबवले जात आहेत.

त्यामुळे स्वेरीला विविध पातळ्यांवर अभूतपूर्व यश मिळत आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सर्वोत्तम पद्धतीने तंत्रशिक्षणाचा प्रसार करत असलेले स्वेरी हे बहुधा एकमेव शिक्षणसंकुल असावे. मी देखील विद्यार्थी चळवळीतून पुढे आलो. विद्यार्थ्यांची पॉवर दाखवत आणि 'वंदे मातरम' चा नारा देत शिक्षण घेतले. आज अभियंता असूनही राजकारणात एक सकारात्मक विचार घेऊन व समाजासाठी काहीतरी करावे या हेतूने डॉ. रोंगे सरांची आणि त्यांच्या टीमची प्रेरणा घेत त्यांचे अनुकरण करत आहे. स्वेरीचे विद्यार्थी आज प्रचंड प्रमाणात यशस्वी होत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवून त्यांचे करिअर बनवण्याचे अत्यंत अवघड कार्य डॉ. रोंगे सरांनी हाती घेतले आहे, हे खरोखर कौतुकास्पद आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाला अधिक वेळ न देता स्वतःला घडविण्यासाठी जास्तीत जास्त वेळ द्यावा. आपल्या आई-वडिलांचे ऋण फेडण्यासोबतच आपल्याला देश घडवायचा आहे हे आपण लक्षात ठेवावे.' असे प्रतिपादन माळशिरस विधानसभेचे आमदार राम सातपुते यांनी केले.

स्वेरी संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरस विधानसभेचे आमदार राम सातपुते हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे प्रभारी कुलगुरू डॉ. रजनीश कामत हे होते. दीप प्रज्वलनानंतर स्वेरी गीताच्या ध्वनीमुद्रिकेचे अनावरण करण्यात आले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांनी प्रास्ताविकातून सर्वांचे स्वागत करून स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वाटचालीवर प्रकाश टाकला. १९९८ साली पत्र्याच्या शेड पासून सुरु झालेला हा प्रवास मोठमोठ्या इमारतींपर्यंत कसा पोहचला? या दरम्यान आलेल्या अडचणी आणि त्यावर केलेली मात यावर त्यांनी प्रकाश टाकला. पुढे डॉ. बी.पी.रोंगे म्हणाले की, 'स्वेरीच्या या पंचेवीस वर्षांच्या काळात अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे सहकार्य लाभले.

त्या सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी मी त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो. या स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वाटचालीत माझे गुरु विठ्ठल भगवान कुलकर्णी तथा आप्पा सर यांच्यापासून, पंढरपूर तालुक्याचे आमदार कै.सुधाकरपंत परिचारक, तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री दत्तात्रय राणे, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील, माजी कुलगुरू धनागरे, आमदार दिलीप वळसे-पाटील, कै. पी. बी. पाटील, हभप तनपुरे महाराज, भारताचे शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ.अनिल काकोडकर, बाटूचे माजी कुलगुरू डॉ.अशोक घाटोळ, सोलापूरच्या वालचंदचे प्राचार्य कै.डॉ.मदनाईक यांच्यासह, अर्बन बँकेचे अधिकारी भिंगे, गोपाळपूरचे सर्व सरपंच व ग्रामस्थ, स्वेरीचे सर्व देणगीदार, कुटुंबीय, नातेवाईक, मित्र परिवार तसेच अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी स्वेरीला घडवण्यात मोलाचे योगदान दिले.' शिक्षण संचालनालयाचे माजी अध्यक्ष डॉ.एन. बी. पासलकर म्हणाले की, 'विद्यार्थ्यांचा विकास हाच ध्यास' या धर्तीवर स्वेरीचे कार्य अविरतपणे सुरू आहे

याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.' अध्यक्षीय भाषणात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे प्रभारी कुलगुरू डॉ.रजनीश कामत म्हणाले की, 'स्वेरीच्या संशोधनातील प्रगतीमुळे सर्वात प्रथम माझ्या कानावर स्वेरीचे नाव आले असून त्यावेळी स्वेरीमध्ये संशोधन क्षेत्रात 'नॅशनल नॉलेज नेटवर्क' चे मोठे प्रोजेक्ट यशस्वी झाले होते. या ठिकाणी ग्रामीण आणि शहरी असा भेदभाव न राहता स्वेरीने तंत्रशिक्षणाचा विकास आणि त्याचा दर्जा सिद्ध केलेला आहे. पंचवीस वर्षाचा इतिहास उलगडताना स्वेरी सातत्याने करत असलेल्या परिश्रमाचे सार्थक झाले आहे. सर्वांचा विकास करत असताना 'व्हॅल्यू एज्युकेशन' हे देखील महत्त्वाचे आहे. स्वेरीच्या अनेक उपक्रमांमुळे महाराष्ट्रामध्ये स्वेरी इंजिनिअरिंग महाविद्यालयाकडे 'आदर्श महाविद्यालय' म्हणून पाहिले जाते. या महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रित गोष्टी असतात म्हणून स्वेरीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या माध्यमातून स्वेरीतून घडविले जाते. हे अवघड कार्य असून अनेकांना जमले नाही ते स्वेरीने ग्रामीण भागात यशस्वीपणे करून दाखवले याचाही सार्थ अभिमान वाटतो.' असे सांगून त्यांनी स्वेरीच्या कामगिरीचे भरभरून कौतुक केले. यावेळी स्वेरीवर गीत लिहिल्याबद्दल गीतकार प्रा.संतोष मडकी, संगीतकार राजु पुरंदरे, गायक योगेश गायकवाड आणि गायिका अनारकली काराळे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी स्वेरीच्या प्रा. नीता कुलकर्णी यांनी स्वेरीवर स्वरचित कविताही सादर केली. या प्रसंगी स्वेरीचे उपाध्यक्ष हनिफ शेख, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त नामदेवराव कागदे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त प्रा. सी.बी. नाडगौडा, विश्वस्त अशोक भोसले, विश्वस्त एच. एम. बागल, विश्वस्त बी.डी.रोंगे, विश्वस्त एस.टी. राऊत, युवा विश्वस्त प्रा. सूरज रोंगे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ.प्रेमलता रोंगे, डॉ.श्रीदेवी, स्त्रीरोग तज्ञ डॉ.स्नेहा रोंगे, प्रसिद्ध भारुडकार चंदाताई तिवाडी, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, स्ट्रक्चरलचे प्रमोद जोशी, बाटुचे माजी कुलगुरू डॉ. अशोक घाटोळ, स्वेरीच्या गव्हर्निंग बॉडीचे डॉ.विजय कुलकर्णी, शास्त्रज्ञ व्ही. के. सूरी, वालचंद सांगलीच्या प्लेसमेंट विभागाचे संजय धायगुडे, माजी विद्यार्थी संघटनेचे दत्ता घोडके, डॉ.विश्वासराव मोरे, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी परिवारातील सदस्य, विद्यार्थी, पालक, पंढरपूर पंचक्रोशीतील नागरिक, पत्रकार, वकील मित्र, हितचिंतक, सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी केले तर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने सायंकाळी 'स्वरानुभूती' या सांस्कृतिक कार्यक्रमातून पार्श्वगायिका कार्तिकी गायकवाड, कौस्तुभ गायकवाड व कल्याणजी गायकवाड यांच्या भक्ती गीत, भावगीत, मिमिक्रीच्या माध्यमातून सर्वांना मंत्रमुग्ध केले. एकंदरीतच स्वेरीचा रौप्य महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ अतिशय उत्साहात पार पडला.






# अक्कलकोट येथील ट्रामा सेंटर मधील अनाधीकृत भरती प्रक्रिया रद्द करण्याची रिपाईं व रासपची मागणी

**गेल्या अनेक वर्षांपासून ट्रामा सेंटर मंजूर होऊनही सद्यस्थितीत चालू करण्यासाठी शासनदरबारी अनेकांनी पाठपुरावा करून देखील अद्याप ट्रामा सेंटर चालू झाले नाही आणि त्यात महाराष्ट्र विकास ग्रुप कंपनीच्या वतीने आर्थिक देवाणघेवाण करुन आपापल्या मर्जीतील नातेवाईकांना भरती करण्यात आले आहे तरी सदर भरती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी राष्ट्रीय समाज पक्षाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी केले आहे.**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट येथील ट्रामा सेंटर येथे स्टाफ,नर्स, ड्रायव्हर कर्मचारी वर्ग यांची महाराष्ट्र विकास ग्रुप कंपनीच्या वतीने आर्थिक देवाणघेवाण करुन अवैध भरती करण्यात आली आहे. यामध्ये स्थानिकांचा विचार करण्यात आला नसल्याचे दिसून येत आहे.

सदर भरती प्रक्रिया कोणत्याही प्रकारची लेखी अथवा तोंडी परीक्षा घेण्यात आली नाही.

तरी नुकतेच भरती करण्यात आलेली प्रक्रिया रद्द करुन नव्याने जाहिरात प्रसिद्ध करुन लेखी परीक्षा व तोंडी परीक्षा घेउन सेवा भरती करण्यात यावे. तसेच राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी जातीने लक्ष घालून भरती प्रक्रिया निश्पक्षपणे राबविण्यात यावे. कोरोना महामारीच्या वेळी तालुक्यातील अनेकांनी आपल्या जिवाची पर्वा न करता कोवीड सेंटरमध्ये काम केले आहे त्यांना या ट्रामा सेंटर मध्ये प्राधान्य देण्यात यावे अन्यथा आमच्या पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केले आहे.

# तरुण-तरुणींनी मोबाईल दूर ठेऊन अधिकाधिक वेळ ग्रंथालयात द्यावा व आपले करिअर घडवावे : कॅप्टन कुणाल गायकवाड



येवला/प्रतिनिधी :डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक सामाजिक, साहित्य, आर्थिक,राजकीय,सांस्कृतिक व धम्मविचार तरुणांनी आचरणात आणावा व आपल्या शैक्षणिक जीवन काळातच आपली योग्यता सिद्ध करावी असे आवाहन कॅप्टन कुणाल गायकवाड यांनी केले. लोककवी वामनदादा कर्डक यांनी बुद्ध कबीर तुकोबा छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीज्योति महात्मा फुले शाहू महाराज महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या शाहिरीतून लोक माणसात रुजवले तोच वारसा आजच्या कवी गीतकार शाहीर कलावंतांनी पुढे न्यावा व आजच्या देशाच्या सर्वार्थाने विपरीत झालेल्या ज्वलंत सामाजिक ,राजकीय, आर्थिक,सांस्कृतिक, क्षेत्राबद्दलच्या समस्येवर आपल्या शाहिरी कवणातून जळजळीत भाष्य करावं तरुणांनी लेखण्या हाती घेऊन लोकशाही,समता स्वातंत्र्य,न्याय,बंधुता,राष्ट्रीय एकता व एकात्मता या संविधानिक मूल्यावर आपला देश बळकट करावा असे उद्गार कर्मवीर पद्मश्री दादासाहेब गायकवाड यांचे नातू कॅप्टन कुणाल गायकवाड यांनी काढले डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान नाशिक महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय व राष्ट्रीय महाकवी वामनदादा कर्डक मुक्तीभूमी अभ्यासिकेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त वाचक मेळावा व वामनदादा कर्डक यांच्या १०१ व्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध समीक्षक साहित्यिक प्रा डॉ.जीभाऊ मोरे हे होते प्रारंभी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिके चे संस्थापक प्रा शरद शेजवळ यांनी केले मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय व कर्डक अभ्यासिकेच्या स्थापने मागील हेतू हा ग्रामीण,कष्टकरी,शेतकरी, शेतमजूर,श्रमकरी वर्गातील मुलांना विविध स्पर्धा परीक्षा साठी आवश्यक असलेले उपयुक्त पुस्तके व अभ्यासकेसाठी मोफत प्रवेश सुविधा गेल्या चार वर्षापासून पुरवली जात असून जास्तीत जास्त युवक युवतींनी या संधीचा फायदा घेऊन आपले करिअर घडवावे व वाचनालयाच्या साधन सुविधा वृद्धिंगत करण्यासाठी दानदात्यांनी ग्रंथ पुस्तके व फर्निचर स्वरूपातील वस्तू वाचनालयास भेट कराव्यात असे आवाहन यावेळी शेजवळ यांनी केले.

वाचनालयाचे संस्थापक शरद शेजवळ,सचिव शैलेंद्र वाघ,स्मारक समितीचे अध्यक्ष प्रकाश वाघ,उपाध्यक्ष गौतम पगारे,रमेश गायकवाड,सुभाष गांगुर्डे,रणजित संसारे,सुरेश खळे सामाजिक कार्यकर्ते विकास वाहुळ,विकास घोडेराव आदी मान्यवर उपस्थित होते.अभ्यासिकेचे विद्यार्थी मिलिंद पान पाटील ( नीट परीक्षा उत्तीर्ण,सदाशिव वाहूळ रेल्वे कर्मचारी निवड,सविताताई धीवर कामगार तलाठी म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. ह्या प्रसंगी रामभाऊ वाहुळ,प्रदीप पगारे,ऋषी गायकवाड,रोहित गायकवाड,शुभम गायकवाड ,महेश जाधव,ऋतिक गायकवाड,अक्षय गरुड, सुमित गरुड,ललित भांबरे,पवन दळे,समाधान निकाळे, सचिन गरुड,तमन्ना सिद्दीकी, समिक्षा मेथे,जयश्री सदाफळ,साक्षी वाणी,सायली पवार,सुवर्णा पाबळे आदी विद्यार्थी वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजरत्न वाहुळ यांनी केले तर आभार शैलेंद्र वाघ यांनी मानले.

# श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य स्वामीभक्ती प्रसार कार्यास दिशा देणारी : विक्रमसिंह

अक्कलकोट/प्रतिनिधी: अनंतकोटी ब्रम्हांडनायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांचे हे वटवृक्ष मंदिर म्हणजे या भूतलावरील नंदनवन आहे. स्वामींच्या या नंदनवनास असंख्य भाविक अत्यंत श्रद्धेने भेट देऊन श्रींच्या चरणी नतमस्तक होतात. अशा या पावन तीर्थक्षेत्रातील स्वामी समर्थांच्या नंदनवनात राहून सेवा करण्याचे भाग्य महेश इंगळे यांना लाभले आहे. स्वामी समर्थांनी दिलेली सेवा गोड मानून महेश इंगळे हे अत्यंत समर्पित जीवनशैलीच्या कार्यातून आलेल्या भाविकांची सेवा करतात. मंदिर समितीच्या माध्यमातून त्यांनी अनेक स्वामीभक्ती प्रचार प्रसार कार्याची कामे केल्याने भाविकांची स्वामींवरील श्रद्धा दृढ होत चालली आहे. त्यामुळे एका अर्थाने महेश इंगळेंच्या माध्यमातून श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे स्वामी सेवेचे कार्य हे स्वामीभक्ती प्रसार कार्यास दिशा देणारे ठरत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गुप्तवार्ता विभागाचे अधिकारी विक्रमसिंह यांनी केले.

ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी विक्रमसिंह यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी विक्रमसिंह बोलत होते. पुढे बोलताना विक्रमसिंह यांनी

स्वामीभक्तीच्या या प्रसार कार्यातून महेश इंगळे यांनी अनेक स्वामी भक्तांना स्वामी समर्थांच्या या भक्ती साखळीत जोडून अनेक भाविकांना भक्ती मार्गाची दिशा दाखविली असल्याचे सांगीतले. याप्रसंगी त्यांच्या समवेत अक्कलकोट उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, सुरक्षा शाखेचे पोलीस निरीक्षक मुजावर, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, गोपनीय विभागाचे धनराज शिंदे, शिवा बिराजदार, विपुल जाधव, संजय पवार, गिरीश पवार, श्रीकांत मलवे उपस्थित होते.

